# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** मोहाडी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0105 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/07/2021 19:13 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Date From (दिनांक पासून):** 23/07/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/07/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Time From (वेळेपासून):** 15:17 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 15:17 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 23/07/2021 **Time (वेळ):** 17:30 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 019 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/07/2021 18:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** तहसिल कार्यालय मोहाडी ,मोहाडी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** लाला केशव बांडेबुचे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

नक्कल तोंडी फिर्याद, पोलीस स्टेशन मोहाडी, दिनांक:-२३/०७/२०२१,मी लाला केशव बांडेबुचे, वय ३५ वर्षे, रा. नेहरु वार्ड, रोहा, पो. बेटाळा, ता. मोहाडी, जिल्हा भंडारा, व्यवसाय- शेती, मोबाईल नंबर ७७०९४६६१४७

मी दिनांक २०/०७/२०२१ रोजी माझा मित्र अंबर रामदास झेलकर, रा. रोहा याचेसोबत अॅन्टी करप्शन भंडारा येथे श्री. चाटे साहेब यांचे समक्ष एकालोकसेवकाविरुध्द लाच मागणी संबधाने तोंडीतक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

'' मी आज दि. २०/०७/२०२१ रोजी माझा मित्र अंबर रामदास झेलकर, रा. रोहा याचेसोबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात येवून तोंडी तक्रार नोंदवितो की, मी वरील ठिकाणी राहतो व शेतीचे काम करतो. माझेकडे स्वत:चे मालकीचा स्वराज कंपनीचा ७३५ एस.टी. ट्रॅक्टर क्र. एम.एच.३६/ ५७४३ आहे व माझा मित्र अंबर याचेकडे सुदधा स्वत:चे मालकीचा ट्रॅक्टर असुन आम्ही आमचे ट्रॅक्टर शेतीकरीता आणि गावात कोणी घरकुल योजनेचे घर बांधकामाकरीता रेतीची ऑर्डर दिल्यास रेती वाहतुकीसाठी सुध्दा वापरतो.

अंदाजे ०४ ते ०५ दिवसापुर्वी मला व मित्र अंबर झेलकर याला गावातील ट्रॅक्टर मालकांकडुन निरोप मिळाला कि,तहसिलदार साहेब रेतीच्या गाडया पकडुन कार्यवाही करणार आहेत तरी तुम्ही ऐन्ट्रीबाबत (कायदेशीर कार्यवाही न करण्याकरीता देण्यास लागणारा नकदी मोबदला) तहसिलदार श्री बोंबुळे सर यांना जाऊन भेटा, त्यांना तुमच्यासोबत बोलायचे आहे. त्यावर मी आणि माझ्यासोबत घरकुल योजनेचे घर बांधकामाकरीता रेती आणणारे ट्रॅक्टर मालक माझे मित्र अंबर रामदास झेलकर, रा. रोहा असे मिळुन तहसिलदार श्री बोंबुळे यांना भेटण्याकरीता त्यांचे तहसिल कार्यालय, मोहाडी येथे गेलो. तहसिलदार श्री बोंबुळे आपल्या ऑफीसमध्ये हजर होते. आम्ही त्यांचे चैंबरमध्ये गेलो असता त्यांनी आम्हाला, तुम्ही घरकुल योजनेचे घर बांधकामावर विना रॉयल्टीची रेती नदीघाटातुन काढुन वाहतुक करीता स्वत:चे ट्रॅक्टर चालविता. ते पकडुन मी कार्यवाही करीन, नाहीतर तुम्ही मला प्रत्येक ट्रॅक्टर चे १५,०००/-रु. महिना ऐन्ट्री द्यावी लागेल अशी धमकी दिली. त्यावर आम्ही दोघेही त्यांना, सर आम्ही उद्या येतो असे म्हणुन तिथुन बाहेर निघालो व गावी परत आलो.

काल दिनांक १९/०७/२०२१ ला मी आणि माझा मित्र श्री अंबर झेलकर मिळुन पुन्हा तहसिलदार श्री बोंबुळे यांना भेटण्यास तहसिल कार्यालय, मोहाडी येथे अंदाजे ११:३० वा. दरम्यान गेलो असता तिथे आम्हाला तहसिलदार श्री बोंबुळे साहेब भेटले. त्यांनी आम्हाला मी सध्या कोर्टात जात आहे, तुम्ही दुपारी ०२:०० वा. नंतर येऊन भेटा असे सांगितले. त्यांनतर आम्ही दोघेही आमचे गावी परत आलो व चर्चा केली की आपल्याला घरकुल योजनेच्या घर बांधकामावर रेती टाकण्याकरीता तहसिलदार श्री बोंबुळे साहेब यांना प्रत्येक ट्रॅक्टरचे महिन्याला १५,०००/-रु. लाच द्यावयाची नाही.

माझा व माझा मित्र अंबर झेलकर याचा श्री. बोंबुळे साहेब, पद- तहसिलदार, तहसिल कार्यालय, मोहाडी, ता. मोहाडी, जि. भंडारा यांचेसोबत कोणताही वाद किंवा दुश्मनी नाही किंवा आर्थिक व्यवहारही नाही. त्यांनी मला व माझा मित्र अंबर झेलकर याला गावातील घरकुल योजनेचे सुरु असलेल्या घराचे बांधकामावर ट्रॅक्टरने रेती वाहतुक करण्यासाठी प्रती ट्रॅक्टर प्रत्येक महिन्याला १५,०००/-रु. असे एकुण ३०,०००/-रु. लाचेची मागणी केली असल्याने व मला आणि माझा मित्र अंबर झेलकर याला त्यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने आम्ही त्यांचे विरोधात तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग भंडारा येथे आलो आहे.

आम्ही दोघेही शिक्षीत आहोत परंतु लेखी तक्रार कशी लिहायची हे माहीत नसल्याने तोंडी तक्रार लिहुन घ्यावी अशी विनंती केल्याने माझे सांगणेवरुन माझी तोंडी तक्रार संगणकावर नोंदविण्यात आली आहे. त्याची प्रिंट काढून मला वाचण्यास दिली. सदर तक्रार माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे. '' अशी तोंडीतक्रार दिली होती.

श्री. चाटेसाहेब यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली यलॅपटॉपवर टंकलिखित केलेली तोंडी तक्रारवाचण्याकरीता दिली व पंचांनी तक्रार वाचुन त्यावर दोन्ही पंच, श्री चाटे साहेब व मी सही केली.

त्यानंतर श्री. चाटे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीवर पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविले व पडताळणी कार्यवाही ही मोहाडी परिसरातुन करावयाची आहे असे सांगुन मला व मित्र झेलकर यांना माझे कडील मोटार सायकलने मोहाडी परिसरात जाण्यास रवाना करुन आमचे मागे मागे श्री. चाटे साहेब व कार्यवाहीतील दोन्ही पंच व स्टॉप सह त्यांचे कडील खाजगी चारचाकी वाहनाने आले. मी , मित्र झेलकर व श्री. चाटे साहेब स्टॉप सह चंडेश्वरी माता मंदीर परिसरात

समक्ष.

लाला केशव बांडेबुचे

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रोहा ,मोहाडी ,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रोहा ,मोहाडी ,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7709466147

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | देवदास चमरू बोंबर्डे | | | 1. पराते कॉम्प्लेक्स जवळ ,शास्त्री वार्ड गोंदिया,गोंदिया ,मोहाडी,भंडारा,महाराष्ट्र,भारत<br>2. पराते कॉम्प्लेक्स जवळ ,शास्त्री वार्ड गोंदिया,गोंदिया ,गोंदिया शहर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दराचे 60चलनी नोटा असे एकुण | 30,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 30,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., If any (इनक्वेसट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. येळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी आपल्या लोकसेवक पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करून वाम भ्रष्ट मार्गाचा अवलंब करून स्वतःचे आर्थीक लाभा करीता तक्रारदार व त्यांचा मित्र श्री. अंबर झेलकर यांना ट्रक्टरने गावातील घरकुल योजने अंतर्गत मोहाडी तहसील परिसरातील नदीपात्रातील घाटामधुन विना रायल्टी रेती काढुन वाहतुक करण्यासाठी व त्यावर कोणतीही कायदेशीर कारवाही न करण्यासाठी मोबदला म्हणुन प्रति माह प्रत्येक ट्रक्टरचे 15000/- रूपये असे एकुण 30,000/- रूपये दिनांक 20/07/2021 रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान लाचेची मागणी केली आणि ती लाच न दिल्यास कार्यवाही करण्याची धमकी देवुन ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आणि आज दिनांक 23/07/2021 रोजी 15.17 वा. आलोसे यांनी सापळा कार्यवाही दरम्यान 30,000/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याने आलोसेविरुध्द सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

पोहचलो. त्यानंतर श्री. चाटे साहेब यांनी मला, मित्र झेलकर व पंच यांना पडताळणी कार्यवाही बाबत सुचना समजावुन सांगीतल्या.

त्यांनतर श्री. चाटे साहेब यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यानत्यांचे कडील कार्यालयीन व्हाईस रेकॉर्डर सुरु करूनमाझ्या गळयात लटकवल्यानंतर मी, पंच क्र. १व मित्र झेलकर यांचे सह गै.अ. श्री बोंबुळे साहेब यांना भेटण्याकरीता त्याचे तहसील कार्यालय मोहाडी येथेमित्र झेलकर यांचेमोटारसायकल क्रमांक एम.एच. -४०/एडी-३९७२ नीगेलो. गै.अ. श्री बोंबुळे साहेबयांचे तहसील कार्यालय मोहाडी येथे गेलो असता गै.अ. श्री बोंबुळे साहेब हे हजर होते. मी व मित्र झेलकर आम्ही गै.अ. श्री बोंबुळे साहेब यांचेशी आपले कामाबाबत बोलणी केली असता **''गै.अ. श्री बोंबुळे साहेब यांनी गावातील घरकुल योजनेचे बांधकाम सूरु असलेल्या घरी नदीघाटातुन विना रॉयल्टी रेती कादुन वाहतुक करण्याकरीता व त्याबाबत कोणतीच कायदेशीर कार्यवाही न करण्याकरीता मला व मित्र झेलकर यांना प्रत्येक ट्रॅक्टरचे प्रती १५,०००/-रु. असे एकुण ३०,०००/-रु. लाचेची मागणी केली''**त्यावर आम्हीउदया पैसे आणुन देतो असे बोलुनमी चंडेश्वरी माता मंदीर परिसरात पंच क्र १ व मित्र झेलकर यांचेसह परत आलो.मी पंचासह परत आल्यावर श्री. चाटे साहेब यांनीमाझ्या गळयात लटकवलेलाव्हाईस रेकॉर्डर कादुन त्यामधिल रेकॉर्ड झालेले संभाषन आमचे व दोन्ही पंचा समक्ष ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.त्यानंतर श्री. चाटे साहेब यांनी मला, मित्र झेलकर व दोन्ही पंचाना गै.अ. यांनी लाचेची मागणी केली असुन त्यामध्ये तुम्ही गै.अ. यांना उदया पैसे आणुन देतो असे सांगीतले म्हणुन गै.अ. यांचे विरुध्दची पुढील सापळा कार्यवाही उदया दिनांक २१/०७/२०२१ रोजी सकाळी करावयाची ठरवुन मला व मित्र झेलकर यांना ॲन्टी करप्शन कार्यालय भंडारा येथे ३०,०००/- रुपये घेवुन येण्याचे सांगीतल्याने मी १५ हजार आणि झेलकर याने १५ हजार रुपये घरून घेवुन मित्र झेलकर यांचे सह त्याचे मोटारा सायकलने तसेच श्री. चाटे साहेब हे दोन्ही पंच व स्टॉप सह त्यांचेकडील खाजगी वाहनाने ॲन्टी करप्शन कार्यालय भंडारा येथे जाण्यास निघालो. काही वेळाने आम्ही ॲन्टी करप्शन कार्यालय भंडारा येथे पोहचलो. त्यानंतर श्री. चाटे साहेब यांनी झालेल्या कार्यवाही बाबतचा पडताळणी पंचनामा तयार केला.

त्यानंतर श्री. चाटे साहेब यांनी गैरअर्जदार श्री बोंबुळे तहसिलदार, तहसिल कार्यालय, मोहाडी यांना त्यांनी मागणी केलेली लाच रक्कम मला व मित्र अंबर झेलकर यांना लाच रक्कम ३०,०००/- रुपये हजर करण्यास सांगीतले त्यावर आम्ही आमचे कडील ५००/-रुपये दराच्या एकुण ६० चलनी नोटा असे एकुण ३०,०००/-रु. दोन्ही पंचासमक्ष श्री. चाटे साहेब यांचेकडे दिले. त्यांनतर ॲन्टी करप्शन भंडारा येथील एका कर्मचाऱ्याने आम्ही दिलेल्या नोंटावर चमकणारी पावडर लावुन त्यावर निळया रंगाच्या टॉर्चने प्रकाश टाकुण निळया रंगाचा प्रकाश टाकल्याने नोटांवर लावलेली पावडर चमकते अशी कार्यवाही करून दाखवुन माहीती सांगीतली. श्री. चाटे साहेब यांनी हयाच नोटा उदया दिनांक २१/०७/२०२१ रोजी गै.अ. यांना सापळा कार्यवाही दरम्यान दयावयाचे असल्याचे सांगीतले. मला व मित्र झेलकर यांना सदर कार्यवाही बाबत गोपनीयता बाळगण्याचा सुचना समजावुन सांगुन दिनांक २१/०७/२०२१ रोजी सकाळी १०:०० वा. ॲन्टी करप्शन कार्यालय भंडारा येथे येण्याचा सुचना देवनु मला व मित्र झेलकर यांना घरी जाण्यास सांगीतले.

श्री. चाटे साहेब यांनी दिलेल्या सुचनाप्रमाणे दिनांक २१/०७/२०२१ रोजी सकाळी १०:०० वा. मी व मित्र झेलकर यांचे सोबत ॲन्टी करप्शन भंडारा येथे पोहचलो. श्री बोंबुळे साहेबहे तहसील कार्यालय मोहाडी येथे तहसील कार्यालयात आलेले नाहीत. आज बकरी ईद निमीत्याने शासकिय सुट्टी असल्याने श्री. बोंबुळे साहेब त्यांचे कार्यालयात हजर राहण्याची शक्यता नाही असे सांगीतले, त्यावर श्री. चाटे साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही उदया दिनांक २२/०७/२०२१ रोजी करण्याचे ठरवुन त्याबाबतचा पंचनामा कार्यवाही पुर्णकेली तसेच मला, मित्र झेलकर यांना कार्यवाहीबाबत गोपनियता बाळगण्याबाबत सुचना दिल्या.

दिनांक २२/०७/२०२१ रोजी श्री. चाटे साहेब यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मी व मित्र झेलकर यांचे सोबत श्री बोंबुळे तहसिलदार हे तहसिल कार्यालय मोहाडी आले किंवा कसे याबाबत माहीती घेतली असता श्री बोंबुळे तहसिलदार हे त्यांचे कार्यालयात हजर आले नाही असे मोबाईल फोनवरुन श्री. चाटे साहेब यांना माहीती दिली. सायंकाळी अदांजे ५:१५ वा. सुमारास श्री. चाटे साहेबांचा फोन आला त्यांना मी सांगीतले की, श्री बोंबुळे तहसिलदार हे आतापर्यंत त्यांचे कार्यालयात हजर झाले नाहीत म्हणुन श्री. चाटे साहेब यांनी मला श्री बोंबुळे तहसिलदार यांचे विरुध्दची पुढील कार्यवाही ही दिनांक २३/०७/२०२१ रोजी करण्याचे ठरविले. दिनांक

समक्ष
[signature]

[signature]

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rahul Pandurang Deshpande(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Rahul Pandurang Deshpande

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

२३/०७/२०२१ रोजी आपण मॉ. चंडेश्वरी मंदीर परिसरात येवुन थांबावे आम्ही तिथेच पोहचून श्री बोंबुळे तहसिलदार यांचे विरूध्द पुढील कार्यवाही करू असे सांगुण आम्हाला घरी परत जाण्यास सांगीतले.

आज दिनांक २३/०७/२०२१ रोजी मी व माझा मित्र झेलकर यांचेसह चंडेश्वरी मंदीर रोडवर थांबलेलो होतो. श्री. चाटे साहेब, कार्यवाहीतील दोन्ही पंच व त्याचा पोलीस स्टॉपसह खाजगी कारने आले. श्री. चाटे साहेब यांनी सापळा कार्यवाही आयोजीत करण्याचे ठरवुन मला व मित्र झेलकर यांना सापळा कार्यवाही बाबत सुचना देवुन सापळा कार्यवाही करीत असतांना माझ्या गळ्यात व्हाईस रेकॉर्डर लटकवुन पावडर लावलेल्या ३०,०००/- रूपये एका बॅग मधुन काढुन माझ्या जिन्सच्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. उकंडे यांचे हस्ते ठेवले. त्यानंतर लाच रक्कम घेवुन पंच श्री अंबादे यांचे सोबत मित्र झेलकर यांचे मोटारसायकलने श्री. बोंबुळे यांचेकडे पाठविले. आमच्या मागोमाग श्री. चाटे साहेब, पंच क्र. २ व त्यांचे कडील पोलीस स्टॉपसह त्यांचे वाहनाने आले. मी, झेलकर आणि पंच श्री. अंबादे यांचेसह श्री. बोंबुळे तहसीलदार यांचेकडे तहसील कार्यालय, मोहाडी येथे गेलो तेव्हा ते त्यांचे ऑफिसमध्ये होते. मी, झेलकर यांनी पंच श्री. अंबादे यांचे समोर आपल्या कामाबाबत बोलुन त्यांना माझ्या कडील ३०,०००/- रूपये लाच रक्कमेबाबत बोललो असता. त्यांनी मला आपल्या ऑफिसमधील बाजुच्या खोलीत घेवुन गेले व मला ३०,०००/- रूपये लाचेची मागणी केली तेव्हा मी माझ्या जिन्स पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशातील ३०,०००/रूपये काढुन त्यांचे कडे दिले. ती लाच रक्कम त्यांनी आपल्या उजव्या हातानी स्विकारून एका पांढऱ्या रंगाचे कागदात गुंडाळुन स्टुलवर ठेवली. त्यानंतर आम्ही तहसीलदार यांचे ऑफिसमधुन बाहेर आलो. व श्री. चाटे साहेब यांनी सांगीतल्याप्रमाणे लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. तेव्हा श्री. चाटे साहेब व अॅन्टी करप्शनचे लोक तहसीलदार यांचे ऑफिसमध्ये आले व श्री. चाटे साहेब यांनी श्री. बोंबुळे साहेब यांना आपला परिचय देवुन त्यांना ताब्यात घेतले व त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपला नाव देवदास चमरू बोंबर्डे, वय ५४ वर्षे, पद तहसीलदार,तहसील कार्यालय मोहाडी असे सांगीतले. त्यांनतर श्री चाटे साहेब यांनी तहसीलदार श्री. बोंबर्डे यांना लाच रक्कमेबाबत विचारपुस करून त्यांचे कडुन लाच रक्कम ताब्यात घेवुन त्यांचे कडून माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम व लाच रक्कम ठेवण्याकरीता वापरलेला एक कागद जप्त केले.

मी व माझा मित्र श्री. अंबर झेलकर यांना तहसीलदार श्री. देवदास चमरू बोंबर्डे यांनी मला व मित्र झेलकर यांना **''ट्रक्टरने गावातील घरकुल योजनेअंतर्गत मोहाडी तहसील परिसरातील नदीपात्रातील घाटामधुन विना रॉयल्टी रेती काढुन वाहतुक करण्यासाठी व त्यावर कोणतीही कायदेशीर कारवाही न करण्यासाठी''** मोबदला म्हणुन प्रति माह प्रत्येक ट्रक्टरचे १५०००/- रूपये असे एकुण ३०,०००/- रूपये लाचेची दिनांक २०/०७/२०२१ रोजी पडताळणी कार्यवाही दरम्यान मागणी केली आणि ती लाच न दिल्यास कार्यवाही करण्याची धमकी देवुन ती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आणि आज दिनांक २३/०७/२०२१ रोजी१५:१७ वा. दरम्यानतहसीलदार श्री. देवदास चमरू बोंबर्डेयांनी ३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारल्याने श्रीदेवदास चमरू बोंबुर्डे, वय ५४ वर्षे, पद तहसीलदार,तहसील कार्यालय मोहाडी जिल्हा भंडारा यांचे विरूध्द कार्यवाहीस्तव: मी फियार्द देत आहे.

हिच माझी फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली असुन, वाचुन पाहीली ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्यावर मी सही केली.

समक्ष

(signature)

जि. भंडारा

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)